**गिरीष सोसायटी विरुध्द**

**शानु पटेल व इतर**

**निशाणी. १८३**

**दिनांक ११/०४/२०२६**

वादी संस्थेचे साक्षीदार क्र. १ श्रीमती उज्वला उदय हर्षे वय ७५, व्यवसाय निवृत्त यांचा वादी तर्फे ॲड श्री. एम. पी. पाटील यांच्या मार्फत दिनांक १०/०४/२०२६ रोजी तहकुब झालेला उलटतपास सुरू.

२९. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०७/१९८८ च्या सभेतील ठराव क्र. ८ व ९ नंतर वादी संस्थेने कलेक्टर यांना शाळा बांधकामाविषयी दिनांक ०१/०६/१९८५ रोजी पत्र दिले. हे म्हणणे खरे नाही की, वादी संस्थेने ०७/०८/१९९१ रोजी बांधकामाची नोंद करण्याबाबत ग्रामपंचायत वारजे यांना पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, जानेवारी १९९३ मध्ये वादी संस्थेने खुली जागा ३१९७ चौ. मी. जागेचे ताबा पत्र लिहुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, जानेवारी १९९३ मध्ये वादी संस्थेने सरपंच ग्रामपंचायत वारजे यांना बांधकामाला परवानगी मिळण्याबाबत पत्र दिले होते.

३०. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. १५ मध्ये मी जे रु.३,४३,३९७/- दरमहा नुकसान भरपाई मागत आहे, ती रक्कम ज्या वेळी संस्थेच्या चेअरमनने दावा दाखल केला, त्यावेळी त्यांनी बाहेर चौकशी करुन ती रक्कम ठरवली असेल. रु.१०/- चौ. फु. प्रमाणे जी नुकसान भरपाईची मागणी केली आहे या संबंधी मी स्वत: काही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, रु.१०/- चौ. फु. प्रमाणे जी मागणी केली आहे त्याच्या पृष्ठार्थ कागदोपत्री पुरावा दाव्यात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कागदोपत्री ३,१९७ चौ.

मी . जागा प्र. क्र. २ ट्रस्टला दिल्याचे दिसत असुन वैयक्तिक प्र. क्र. १ शानु पटेल यांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्र. क्र. २ ट्रस्टला जागा दिल्यामुळे प्र. क्र. १ यांची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी नाही.

३१. हे म्हणणे खरे नाही की, ०३/०७/१९८८ च्या इत्तिवृत्तामध्ये कोणताही फेरफार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्र. क्र. १ ने संस्थेचे कोणतेही रेकॉर्ड गाहाळ केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात व माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात प्र. क्र. १ विरुदध जे आरोप केले आहेत ते सर्व खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्र. क्र. १ ला त्रास देण्यासाठी खोटा दावा केला असुन आज मी खोटी साक्ष देत आहे.

३२. हे म्हणणे खरे आहे की, वादी संस्थेने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे २८३१/२०२३ हे रीट पिटीशन केले होते. हे म्हणणे खरे नाही की, या रीट पिटीशन सोबत वादी संस्थेने ग्ा्रमपंचायत वारजे यांनी बांधकामला परवानगी दिली नाही असे पत्र संस्थेला दिले होते. त्या पत्रामध्ये ग्रामपंचायतीने असे कळविले आहे की, संस्थेने ग्रामपंचायतीला कळविले होते की, एकुण जागेपैकी ४,००० चौ. फु. जागा संस्थेने प्र. क्र. २ यांना अलॉट केली होती किंवा कसे अशा पद्धतीचे पत्र माझ्या पाहण्यात आलेले नाही.

प्र. क्र. १ चा उलटतपास पुर्ण.

३३. प्र. क्र. २ तर्फे ॲड श्री. एम. बी. पाटील यांच्या मार्फत उलटतपास सुरु.

वादी संस्थेमध्ये एकुण ७० सभासद आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी संस्थेने सर्व सभासदांना प्लॉट अलॉट केलेले आहे. प्लॉट अलॉटमेंट पत्र सर्व सभासदांना दिलेले आहे. संस्थेने प्लॉट अलॉटमेंट

रजिस्टर ठेवलेले नाही. २०१० साली निवडणुक अधिकाऱ्यांने सर्वसाधारण सभा घेवुन व्यवस्थापक समिती स्थापन केली ज्यामध्ये ७ ते ८ संचालक होते. हे म्हणणे खरे आहे की, मी २०१० पासुन संस्थेची संचालक आहे. मी संचालक झाल्या पासुन आजपर्यंत अंदाजे १५० सभांना हजर आहे. ह्या सभा आहेत याची माहिती मागच्या सभेला पुढील सभेची तारीख सांगुन सभा घेतल्या जात असत, आता व्हाटसअॅप वर सभेची माहिती दिली जाते. सभांमध्ये कोणते विषय राहणार या संबंधीची विषय पत्रिका तुम्हाला दिला जात होती असा प्रश्न विचारला असता साक्षीदार उत्तर देतात की, वार्षीक सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका दिल्या जाते, बाकी सभेमध्ये कधी कधी विषय प्रत्रिका दिल्या जाते तर कधी कधी सभेमध्ये गेल्या नंतर तोंडी विषय सांगीतल्या जातात. वार्षीक सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका सभासदांना दिल्या नंतर सभासद विषय पत्रिका मिळाल्याची पोहच देतात. वार्षीक सभेची विषय पत्रिका सचिव तयार करतो.

३४. आता मला निशाणी १९९ चे व्यवस्थापकीय समिती दिनांक ०४/१०/२०२४ चा ठराव दाखविण्यात आला. या सभेमध्ये मी हजर होती. या सभेची विषय पत्रिका सभेत सांगितली होती का? हे आता मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, ०४/१०/२०२४ च्या सभेमध्ये ठराव पारीत झाला याची मला माहिती नव्हती . हा ठराव माझ्या उपस्थितीत मंजुर झाला. त्या सभेमध्ये मी साक्ष देण्यासाठी तयार आहे का असे मला विचारण्यात आले होते. मी त्यावर हो असे उत्तर दिले. निशाणी १९९ च्या ठरावातील हस्ताक्षर माझे आहे. हे म्हणणे खरे आहे की, हे हस्ताक्षर माझे आहे म्हणुन मी ओळखते. त्या ठरावावर सचिव दिपक शशिकांत गोखले यांची सही आहे. मी त्यांना सही करताना पाहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की. मी दिपक गोखले यांना सही करतांना पाहिले म्हणुन ओळखते की, ही त्यांची सही आहे.

हे म्हणणे खरे आहे की, मला ०४/१०/२०२४ च्या ठरावाचे वैयक्तिक व प्रत्यक्ष ज्ञान आहे. हे म्हणणे खरे आहे की, ०४/१०/२०२४ च्या सभेमध्ये जी चर्चा झाली तिच माहिती ठरावा मध्ये नमुद आहे.

३५. प्रश्नः- दिनांक ०४/१०/२०२४ च्या ठरावामध्ये काही आक्षेपार्ह्य असते तर तुम्ही तक्रार केली असती?

वादींचे वकील ॲड श्री. मैंदर्गी यांनी सदर प्रश्न विचारण्यास हरकत घेतली कारण सदर प्रश्न दाव्याशी संबंधीत नाही.

आदेशः- सदर ठरावाच्या आधारे साक्षीदार पुरावा देत असुन विचारलेला प्रश्न सदर ठरावाशी संबंधीत असल्या कारणाने प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.

उत्तरः- हे म्हणणे खरे आहे की, ०४/१०/२०२४ च्या ठरावामध्ये काही आक्षेपार्ह्य असते तर मी संस्थेकडे तक्रार केली असती.

३६. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या ज्या वार्षीक सर्वसाधारण सभांना हजर राहीली त्या सभांच्या मजकुरामध्ये काही आक्षेपार्ह्य नमुद असते तर मी तक्रार केली असती.

३७. आता मला निशाणी १९५ चे मुळ इत्तिवृत्त पुस्तक दाखविण्यात आले. हे मुळ इत्तिवृत्त मी २०१२-१३ नंतर पाहिले. या इत्तिवृत्तामध्ये ज्या हिरव्या टिकमार्क केलेल्या आहे त्या ऑडिटरने तपासल्या बद्दल खुणा केल्या आहेत.

३८. आता मला दिनांक ०३/०७/१९८८ च्या सभेचे वार्षिक इत्तिवृत्त दाखविण्यात आले. या सभेची विषय पत्रिका मी पाहिली आहे. आता मला निशाणी १४४ ची विषय पत्रिका दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर विषय पत्रिका दिनांक ०३/०७/१९८८ च्या सभेची असुन वादी संस्थेंने निशाणी १२९-अ च्या यादी सोबत दाखल केली

आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर विषय पत्रिका सभासदाना पोहच केल्या बद्दलचा कागदोपत्री पुरावा दाव्यात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०७/१९८८ ला झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका निशाणी १४४ ची नाही.

३९. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेची व्यवस्थापकीय समिती जरी बदलली तरी संस्थेचे रेकॉर्ड संस्थेमध्येच राहते. मला माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्रं. १६ दाखविण्यात आला. या परिच्छेदातील मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, परिच्छेद १६ संबंधीचे कागदपत्र संस्थेमध्ये आहे. मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्रं. १६ मध्ये जे प्रतिवादींना नोटीस दिल्याचे व त्याचे उत्तर आल्याचे कथन केले आहे ती नोटीस व त्यांचे उत्तर दाव्यात दाखल केलेले नाही. ती नोटीस व त्याचे उत्तर मी दाव्यात दाखल करणार आहे किंवा कसे ते मी आता सांगु शकत नाही. दाव्यातील वादाकिंत मुद्या संबंधी मी इतरत्र साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ऐकीव माहिती वर साक्ष देत आहे.

४०. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर १९९० साली बांधकाम पुर्ण झाले. हे म्हणणे खरे आहे की, बांधकाम सुरु असतांना सभांसदानी संस्थेकडे तक्रार केली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, सभासदांना माहिती नव्हते कारण त्यावेळी तिथे पाच सभासद राहायला होते. हे म्हणणे खरे आहे की, राहायला असणाऱ्या पाच सभासंदानी बांधकामाची तक्रार केली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, पाच पैकी दोन सभासद प्र. क्र. १ व ९ आहेत. बाकी तिन सभासदांनी तक्रार केल्याचे रेकॉर्ड संस्थेकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, प्र. क्र. ९ बांधकामाच्या वेळी तिथे राहत होते.

४१. आता मला माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. ४ दाखविण्यात आला. त्यामध्ये असे कथन केले आहे की, संस्थेच्या सभासदापैकी प्र. क्र. १ यानेच दिलेल्या भुखंडावर त्याचे घर बांधले होते. हे म्हणणे खरे नाही की, १९९० साली संस्थेने सभासदांना प्लॉट अलॉट केल्या नंतर प्र. क्र. १ यानेच १९९० साली त्याच्या प्लॉट वर बांधकाम केले. १९९० साली असलेल्या पंच कमिटीच्या सदस्यानी बांधकामा बाबत कोणतिही तक्रार केली नाही किंवा कसे याबाबतच रेकॉर्ड संस्थेकडे उपलब्ध नाही.

४२. आता मला निशाणी १४६ चा कबुली दस्त दाखविण्यात आला तो वादी संस्थेने दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १४६ चा दस्त वादी संस्थेंने प्रतिवादी क्र. २ च्या लाभात करुन दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १४६ च्या सोबत जी ताबे पावती आहे ती वादी संस्थेने प्र. क्र. २ यांना करुन दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १४६ च्या सल्गन (Annexure) दस्त वादी संस्थेने प्र. क्र. २ यांना करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की. प्र. क्र. २ ने संस्थेच्या परवानगीने बांधकाम केलेले आहे व कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी संस्थेने प्रतिवादींकडुन मागणी केलेली नुकसान भरपाईची रक्कम वादी संस्थेच्या ताळेबंदात दाखविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये जे दस्त रद्द करुन मागितलेले आहेत ते दस्त रद्द करण्याबाबतचा ठराव संस्थेने केलेला नाही.

४३. प्र. क्र. ९ गाडगिळ यांनी दावा दाखल करण्यापुर्वी व दावा दाखल झाल्या नंतर प्र. क्र. १ विरूद्ध संस्थेकडे तक्रार केलेली नाही किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की प्र. क्र. ९ ने संस्थेकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे

नाही की, पस्तुतचा दावा दोन संचालक मंडळाच्या वादातुन दाखल झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दाव्यातील घटनेबाबत प्रत्यक्ष माहिती नसुन मी संस्थेच्या कागदपत्रांच्या आधारे साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दाव्याती घटनेची प्रत्यक्ष माहिती नसताना कोणाच्या तरी सांगण्यावरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्र. क्र. २ यांना त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केला असुन खोटी साक्ष देत आहे.

प्रतिवादी क्र. २ यांचा उलटतपास पुर्ण.

इतर प्रतिवादीच्या उलटतपासासाठी पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**समक्ष,**

**श्रीमती, अंजु जाधव**
**न्यायाधीश,**
**सहकार न्यायालय क्र. १ पुणे.**

सही/-
साक्षीदार:- श्रीमती. उज्वला उदय हर्षे
दिनांक:- ११/०४/२०२६